# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

दिनांक 11.02.2019 सोमवार

(गुन्हे)

**1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मुदाका अन्वये 04 केसस 04 आरोपींना अटक करून, 38,200 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 03 केसस 23 आरोपींना अटक करून 2,20,920 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा–या 65 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 617 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क निरंक वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**2) पो.स्टे. गिट्टीखदान – घरफोडी :**

दिनांक 10.02.2019 चे 1415 वा ते 1445 वा दरम्यान पो.स्टे. गिट्टीखदान हद्यीत प्लॉट नं. बी/42, आशादीप सोसायटी, साई मंदीर जवळ, नागपूर येथे राहणारे फिर्यादी सुरेश किसन धाबर्डे, वय 57 वर्ष, यांनी आपले घराला कुलूप लावून पत्नीसह भाजीपाला आणण्याकरीता वाडी येथे गेले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून बेडरूममधील कपाटातील सोन्याचांदीचे दागीने व नगदी 60,000 रू असा एकुण 2,12,000 रू चा मुद्येमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. गिट्टीखदान येथे पोउपनि गोडबोले, 9923695669 यांनी आरोपीविरूध्द कलम 454,380 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**3) पो.स्टे. सिताबर्डी – चोरी :**

फिर्यादी प्रमोद मनोहर पालकर, वय 45 वर्ष, रा. श्री साई नगर, प्लॉट नं. 77, कच्छीमेट, अमरावती रोड, नागपूर यांचे पो.स्टे. सिताबर्डी हद्यीत चाफेकर दुग्ध मंदीर, सिताबर्डी मेन रोड, नागपूर येथे दुकान असून आरोपी अतुल कोसनकर, वय अं. 35 वर्ष, रा. मुल, जि. चंद्रपुर हा दुकानात नोकर आहे. दिनांक 09.02.2019 चे 1500 वा ते 2130 वा दरम्यान आरोपी नोकर याने फिर्यादीचे दुकानाचे कपाटामधून काळया रंगाची बॅग ज्यामध्ये नगदी 3,15,000 रू व मोबाईल असा एकुण 3,20,000 रू चा मुद्येमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. सिताबर्डी येथे सपोनि वाकडे, 9765805928 यांनी आरोपीविरूध्द कलम 381 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**4) पो.स्टे. अजनी – अपघात :**

दिनांक 10.02.2019 चे 1540 वा चे सुमारास उमेश उत्तम तुगावे, वय 27 वर्ष, रा. सुराबर्डी, नागपूर व मित्र नामे मंगल रमेश धुर्वे, वय 30 वर्ष, रा. सुराबर्डी, नागपूर सह दुचाकी गाडी क्र. एमएच/49/टी.सी.डी/247 ने डबलसीट वंजारी नगर कडून तुकडोजी पुतळयाकडे जात असतांना पो.स्टे. अजनी हद्यीत वंजारी नगर, पाण्याचे टाकीजवळ, सिध्दार्थ कॉलेज समोर, नागपूर येथे

समोरून येणारा ट्रक क्र. एमए/40/वाय/7995 चा आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवून दुचाकी गाडीला धडक मारून उमेश व मंगल यास गंभीर जखमी करून ट्रक सोडून पळून गेला. याप्रकरणी फिर्यादी मधू नामदेवराव मानके, वय 45 वर्ष, रा. प्लॉट नं. 143, सत्यसाई सोसायटी, दत्तवाडी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. अजनी येथे सपोनि भास्कर, 9822141417 यांनी आरोपी चालकाविरूध्द कलम 279,337,338 भादंवि सहकलम 134,177 मोवाका अन्वये गुन्हा नोंदविला आहे. (जखमींचा उपचार मेडीकल हॉस्पीटल ट्रामा सेंटर येथे सुरू आहे.)

**5) पो.स्टे. प्रतापनगर – जाळपोळ करून नुकसान करणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 03.02.2019 चे 2200 वा ते 04.02.2019 चे 0230 वा चे दरम्यान पो.स्टे. प्रतापनगर हद्दीत गल्ली नं. 12, कामगार कॉलनी, सुभाष नगर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी अजय भगवान रामटेके, वय 21 वर्ष, यांनी आपली ॲक्टीवा गाडी क्र. एमएच/31/ई.व्ही/9427 पांढ–या रंगाची ही घरासमोर राहणारे रोहीत दाभने यांचे घरासमोर रोडवर लॉक करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात आरोपीने अज्ञात कारणावरून फिर्यादीचे गाडीला आग लावून अंदाजे 20,000 रू चे नुकसान केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. प्रतापनगर येथे पोउपनि एस.जे. केंद्रे, 9975580222 यांनी आरोपीविरूध्द कलम 435 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पो.स्टे. कोराडी :**

दिनांक 08.02.2019 चे 2100 वा चे सुमारास गणपत पांडुरंग चौरागडे, वय 45 वर्ष, रा. गुमथळा, नागपूर, हे कोराडी येथून आपली दुचाकी क्र. एमएच/40/1336 ने गुमथळा येथे जात असतांना पो.स्टे. कोराडी हद्दीत लोणारा ते गुमथळा रोड, जे.आय.टी कॉलेज जवळ कोणीतरी अज्ञात वाहनाचे चालकाने त्यांना धडक दिल्याने ते खाली पडून गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 10.02.2019 चे 1600 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. कोराडी येथे पोहवा जगदीश, 8888822618 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर